CMYK

सिद्धार्थ खरात बांधावरच नव्हे तर चक्क शेतकऱ्यांच्या सोडीवर >>पान 2

लोणार येथे २२० के व्ही वीज उपकेंद्राची निविदा प्रक्रिया सुरु >>पान 3

आमदाराच्या मध्यस्थीने उपोषणाची सांगता >>पान 4

**सुविचार**

ज्याच्याजवळ उमेद आहे,
तो कधीही हरू शकत नाही.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034


वरुण धवनच्या पुतणीला सलमान खानचा आसरा

आतील पान



■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 55 ■ मंगळवार, दि. 01 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## देशी गायी 'राज्यमाता-गोमाता' घोषित, राज्य सरकारनं मंत्रिमंडळ बैठकीत घेतला निर्णय!

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र सरकारनं देशी गायींना 'राज्यमाता–गोमाता' म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेतला आहे. सोमवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये राज्य सरकारनं अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यामध्ये महाराष्ट्रातील देशी गायींना 'राज्यमाता–गोमाता' घोषित करण्याच्या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती हा प्रस्ताव मान्य करून यासंदर्भातला शासन आदेश अर्थात जीआर जारी करण्यात आला आहे.

शासन आदेशात यासंदर्भातली सविस्तर माहिती देण्यात आली आहे.'प्राचीन काळापासून मानवाच्या दैनंदिन जीवनामध्ये गायीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. वैदिक काळापासून गायीचे धार्मिक, वैज्ञानिक व आर्थिक महत्त्व विचारात घेऊन त्यांना काम धेनू असे संबोधण्यात येते.

राज्यातील वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या देशी जातींच्या गायी आढळतात. (उदा. मराठवाडा विभागात देवणी, लालकंधारी, पश्चिम महाराष्ट्रात खिल्लारी, उत्तर महाराष्ट्रात डांगी तर विदर्भात गवळाऊ). तथापि दिवसेंदिवस देशी कायींच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर घट होत आहे', अशी चिंता या आदेशाच्या सुरुवातीलाच व्यक्त करण्यात आली आहे.'देशी गायीच्या दुधाचे मानवी आहारात पौष्टिकदृष्ट्या अधिक मूल्य आहे.




# शेतकऱ्यांना कापूस, सोयाबीन अनुदान वितरण सुरू

## ■ पहिल्या टप्प्यात सुमारे २ हजार ३९९ कोटींचे वाटप
## ■ मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते ऑनलाईन शुभारंभ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना २०२३च्या खरीप हंगामासाठीचे अनुदान वितरणाचा शुभारंभ आज राज्य मंत्रिमंडळ बैठकीत करण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने हे अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले.



कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना पाच हजार रुपये प्रति हेक्टर असे दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रत्येकी ५ हजार रुपये अनुदान देण्याचा निर्णय झालेला आहे. पहिल्या टप्प्यात ४९ लाख ५० हजार खातेदारांच्या खात्यांमध्ये २३९८ कोटी ९३ लाख रुपये जमा करण्यात येत आहेत. राज्यात कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची संख्या सुमारे ९६ लाख ७८७ इतकी आहे.

त्यापैकी ६८ लाख ६ हजार ९२३ खात्यांची माहिती पोर्टलवर भरली गेली आहे. यात नमो शेतकरी महासन्मानच्या माहिती सोबत आधार जुळणी व ७० टक्के पर्यंत नावाची पडताळणी झालेली संख्या ४१ लाख ५० हजार ६९६ इतकी आहे. तर आधार जुळणी व ६९ टक्क्यांहून माहितीची पडताळणी झालेल्यांची संख्या ४ लाख ६० हजार ७३० इतकी आहे. याव्यतिरिक्त आधारसंमतीपत्रानुसार माहिती भरलेल्या खात्यांची संख्या १७ लाख ५३ हजार १३० इतकी आहे.

अशारीतीने ४९ लाख ५० हजार शेतकऱ्यांच्या ६३ लाख ६४ हजार खात्यांवर अनुदानचे अर्थसहाय्य जमा केले जाणार आहे. त्यासाठी २ हजार ३९८ कोटी ९३ लाख रुपयांची तरतूद लागणार आहे.

# नोव्हेबरमध्ये होणार जिल्हा युवा महोत्सव

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे व जिल्हा क्रीडा परिषद तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बुलडाणा यांचे संयुक्त विद्यमाने विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना वर जिल्हास्तरीय युवा महोत्वाचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल बुलढाणा येथे १५ ते २५ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत करण्यात येणार आहे. या महोत्सवात जिल्ह्यातील १५ ते २९ या वयोगटातील युवक, युवतींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे अवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस. महानकर यांनी केले आहे.

युवकांचा सर्वांगिण विकास, संस्कृती परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता निर्माण होण्यासाठी दरवर्षी युवा महोत्सवाचे आयोजन केल्या जाते. या महोत्सवामध्ये विविध उपक्रम राबविण्यात येते. संकल्पना आधारित स्पर्धामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना, सांस्कृतिक उपक्रमामध्ये समूह लोकनृत्त, लोकगीत, वैयक्तिक लोकनृत्य व वैयक्तिक लोकगीत, कौशल्य विकासामध्ये कथा लेखन, चित्रकला, वक्तृत्व, कविता. युवा कृतीमध्ये हस्तकला, वस्त्रोद्योग ग्रो प्रोडक्ट असे उपक्रम राबविण्यात येणार आहे.

युवा महोत्सवाचे आयोजन जिल्हास्तरावर करण्यात येणार असून जिल्ह्याचा प्रतिनिधिक चमु विभागीय युवा महोत्सवासाठी पाठविण्यात येईल. युवा महोत्सवामध्ये, सांस्कृतिक, समुह लोकनृत्य, वैयक्तिक सोलो लोकनृत्य, लोकगीत, वैयक्तिक सोलो लोकगीत, कौशल्य विकास, कथा लेखन, पोस्टर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा (इंग्रजी व हिंदी, फोटोग्राफी, संकल्पना आधारीत स्पर्धा, तृणधान्य उत्पन्न वाढीसाठी विज्ञानाचा वापर, सामाजिक विकासात विज्ञानाचे योगदान, युवा कृती, हस्तकला, वस्त्रोद्योग, ॲग्रो प्रोडक्ट या स्पर्धात्मक बाबींचे आयोजन करण्यात येणार आहे. महत्वाचे रेकॉर्ड केलेले गाणे व म्यूझिक, बॅलें डान्स पात्र राहणार नाही. सादरीकरणामध्ये असभ्यता, धार्मिक व राजकिय भावना दुखावणार नाही याची दखल घ्यावी. असे आढळल्यास सादर केलेला उपक्रम अपात्र समजण्यात येईल. प्रथम क्रमांकाचे स्पर्धकास विभागीय स्तरावर पाठविण्यात येईल.

जिल्हास्तर युवा महोत्सवामध्ये सहभागीसाठी १५ ते २९ वयोगटातील (१२ जानेवारी २०२५ रोजी वयाची परिगणनेनुसार असावा. वयाचा दाखला/आधार कार्ड आवश्यक, जिल्ह्यातील संगीत महाविद्यालये, कृषि महाविद्यालये, विद्यालये, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्र विद्यालये, आयटिआय, विज्ञान महाविद्यालये, समाजकार्य, महिला मंडळे, सांस्कृतिक मंडळे, नोंदणीकृत मंडळे इत्यादींची, १५ ते २९ वयोगटातील युवांना युवा महोत्सवामध्ये सहभागासाठी पात्रता राहील. त्याप्रमाणे स्पर्धक महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

स्पर्धकांनी नाव, पत्ता, जन्म दिनांक, संपर्क क्रमांक, ई–मेल आयडी व वयाबाबतचा सबळ पुरावा सुध्दा सादर करणे आवश्यक आहे. सहभागी युवक, युवतींना सहभाग व प्राविण्य प्रमाणपत्र सुध्दा वितरीत करण्यात येईल. युवा महोत्सवातील प्राविण्य धारकांसाठी रोख (शासन आदेशानुसार) पारितोषिक देण्यात येणार आहेत. अधिक माहीतीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल बुलढाणा किंवा क्रीडा अधिकारी आर. आर. धारपवार, मो.नं. ९९७०११८७९७ यांचेशी संपर्क करावा.

# राज्यात पावसासाठी पुन्हा एकदा पोषक वातावरण!

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** पावसाची वाटचाल थांबली आहे असे वाटत असतांनाच आता हीच वाटचाल अडखळली आहे. राज्यात पुन्हा एकदा पावसासाठी पोषक वातावरण तयार झाले आहे. त्यामुळे येत्या२४ तासात राज्यातील काही भागात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

दक्षिण मध्य महाराष्ट्रापासून कोकणच्या दक्षिण भागात येत्या २४ तासात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर मराठवाड्यासह या भागांमध्ये पावसाचा ''यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. राज्याच्या उर्वरित भागात पावसाच्या हलक्या सरी कोसळण्याची शक्यता आहे.

सोमवारी राज्याच्या बहुतांशी भगत पावसाचा अंदाज भारतीय हवामान खात्याने व्यक्त केला आहे. त्यामुळे सप्टेंबर महिन्याचा शेवट जरी पावसाने होणार असला तरीही ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीला मात्र पावसाची शक्यता नाही. याउलट बऱ्याच दिवसानंतर मोकळे आकाश पहायला मिळेल.

सोमवारचा पाऊस वगळता हवामानात फारसे बदल घडून येणार नाहीत. राज्यातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्गासह इतर किनारपट्टी भागात वातावरण अंशतः ढगाळ राहिल. तर तुरळक ठिकाणी वीजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता राहील. या भागांमध्ये पावसाचा जोर मात्र वाढणार नाही.राजस्थान आणि गुजरातसह हरियाणाच्या काही भागांमधून नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी माघार घेतली. मात्र, अजूनही काही भागातून पावसाचा परतीचा प्रवास सुरू झालेला नाही.

# उबाठाचा सक्षम उमेदवार म्हणून दिलीप वाघ यांच्याकडे मतदारांच्या नजरा

## ■ सिंदखेडराजा मतदार संघ उबाठाला सुटण्याची दाट शक्यता
## ■ संपूर्ण मतदारसंघात दिलीप वाघ यांचे शेतकऱ्यांची स्नेहाचे संबंध



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्हा नियोजन समिती सदस्य, सुलतानपूर सर्कल जिल्हा परिषद सदस्य, शिवसेना ग्राहक संघटना जिल्हाप्रमुख अशा विविध पदावर काम करून कायम सामाजिक कार्याला वाहून घेणारे नेतृत्व म्हणून सुलतानपूर सर्कलचे जिल्हा परिषद सदस्य यांची ओळख आहे. नुकतेच त्यांनी सिंदखेडराजा मतदारसंघात मशाल यात्रा काढून आपल्या सोबत असलेल्या सर्वसामान्य जनतेच्या आशीर्वादाने शक्तीचे प्रदर्शन करीत सर्वांचे लक्ष वेधले आहे. या मशाल यात्रेने दिलीप वाघ यांच्या नावाची संपूर्ण जिल्हाभर चर्चा होत असून विधानसभेचे नेतृत्व करणारे भावी आमदार म्हणूनही त्यांच्याकडे पाहिले जात आहे.

### जनसेवा हीच माझी ओळख

धार्मिक सामाजिक राजकीय यासह शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात जनसेवा करून सर्वसामान्यांच्या विकासासाठी झटत राहणे,त्यांच्यावर झालेला अन्याय दूर करणे,मतदार संघात अथवा सर्कलमध्ये असलेल्या समस्या कशा तात्काळ मार्गी लागतील यासाठी शासन प्रशासनाकडे पाठपुरावा करणे समस्या सोडवून घेणे,आदी जनसेवेची कामे करण्याला माझे प्रथम प्राधान्य राहिले आहे. जनसेवा हीच माझी ओळख आहे. अशी प्रतिक्रिया जिल्हा परिषद सर्कलचे सदस्य दिलीप वाघ यांनी दिली.

---




दिलीप विश्र्वनाथ वाघ यांनी जिल्हा परिषद सदस्य, जिल्हा नियोजन समिती सदस्य, शिवसेना ग्राहक संघटना जिल्हा प्रमुख विविध पदावर काम करून सर्वसामान्यांना न्याय दिला आहे. तर सुलतानपूर मतदारसंघातही अनेक विकासाच विकास कामे केली आहेत. याच कामाच्या बळावर त्यांच्याकडे आता विधानसभेचे नेतृत्व सोपवीले जात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे. सर्वसामान्य जनतेचे हित डोळ्यासमोर ठेवून त्यांनी सामान्य जनतेचा न्याय मिळावा, त्यांच्यावर झालेला अन्याय दूर व्हावा यासाठी समृद्धी महामार्गामध्ये नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना न्याय व रस्ता मिळवून देण्यासाठी वेळोवेळी आंदोलने उभे करुन त्यांना न्याय दिला आहे.समृध्दी महामार्गाच्या वाहनांनी खराब झालेल्या रस्त्याबाबत वेळोवेळी मोठी आंदोलने करून खराब झालेल्या रस्त्याची दुरुस्ती केली आहे. नैसर्गीक आपत्तीने बाधीत शेतक–यांना त्यांच्या मोबदल्याची नुकसान भरपाई मिळविण्यासाठी आंदोलने केली. यासह पक्षाने वतीने वेळोवेळी केलेल्या आंदोलनात सक्रिय सहभाग घेत आंदोलने यशस्वी केली. अत्यंत भयानक असलेल्या कोरोना महामारीच्या काळात गावोगावी जाऊन लोकांना भेट देत मदतही केली. गोरगरिबांना अन्नधान्य पुरवठा, रुग्णांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी रात्रंदिवस लोकांची सेवा केली आहे. आदी सामाजिक कार्यासह धार्मिक कार्यातही त्यांचा मोठा वाटा आहे.मतदार संघातील विविध गावांमध्ये आयोजीत गणेशोत्सव, दुर्गा उत्सव, हरिनाम सप्ताह, अशा विविध प्रकारच्या धार्मिक कार्यक्रमात सहभागी होऊन मदत केली आहे. त्यामुळे सुलतानपूर सर्कलचे जिल्हा परिषद सदस्य दिलीप वाघ यांच्याकडे सर्वसामान्यांना सोबत घेऊन चालणारी नेतृत्व म्हणून पाहिले जाते आता त्यांनी नुकतेच मतदार संघात मशाल यात्रा काढल्याने त्यांच्या नावाची चर्चा संपूर्ण जिल्ह्यात होऊ लागली आहे. तर मतदार संघाचे नेतृत्व करणारे करणारा नेता म्हणूनही त्यांच्या नावाची चर्चा होत आहे. त्यामुळे आगामी सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघात त्यांना नक्की संधी मिळेल, अशी आशा मतदारसंघातील त्यांच्या चाहत्या वर्गाकडून व्यक्त केली जात आहे.

सिंदखेड राजा विधानसभा ही शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला सुटण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. तर विरोधकांना भारी भरेल असा सक्षम उमेदवार म्हणून दिलीप वाघ यांच्याकडे पाहिले जात आहे. दिलीप वाघ यांच्या नावाला संपूर्ण मतदारसंघात मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसादही असल्याचे दिसून येत आहे.तसेच दिलीप वाघ यांचा सिंदखेड राजा व देऊळगाव राजा मतदारसंघातील थेट शेतकऱ्यांसोबत व प्रत्येक गावात संबंध आहे. त्यामुळे आगामी विधानसभेत दिलीप वाघ यांच्या रूपाने उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाला एक सक्षम उमेदवार म्हणून पर्याय निर्माण झाला आहे दिलीप वाघ त्यांच्याकडे आतापासूनच मतदार हे भावी आमदार म्हणून पाहू लागले आहेत.



देविदास खनपटे
मुख्य संपादक
९७६७२३३०३४

CMYK

## बेरोजगारीचे भीषण वास्तव

भारत हा तरुणांचा देश आहे. जगातील सर्वाधिक तरुण भारतात आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ४० टक्के लोकसंख्या ही तरुणांची आहे. आज आपण याच तरुणांच्या जोरावर महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत. भारताचे माजी राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्र्वास होता. या तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे. तरुणांच्या या ऊर्जेचा योग्य वापर झाल्यास भारताला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही असा ठाम विश्र्वास डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांना होता. डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांच्यासारख्या द्रष्ट्या व्यक्तीने जे ओळखले ते आजच्या राज्यकर्त्यांना मात्र ओळखता आले नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल कारण आजच्या तरुणांच्या ऊर्जेचा, त्यांच्या गुणवत्तेचा उपयोग सरकारला करून घेता येता नाही किंवा सरकार जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष करत आहे याचा पुरावाच स्टेट ऑफ वर्किंग इंडिया २०२३ च्या अहवालातून पाहायला मिळतो. या अहवालातून देशातील बेरोजगारीच्या समस्येचे भीषण वास्तव समोर आणले आहे. या अहवालानुसार देशात तरुण पदवीधर बेरोजगाराईचा दर ४२.३ टक्क्यांच्या उच्च स्तरावर आहे, तर कमी शिकलेल्या लोकांच्या बेरोजगारीचा दर ८ टक्के आहे. २५ ते ३० वर्ष वयोगटातील पदवीधर किंवा उच्च पात्रता धारक तरुणांचा बेरोजगरीचा दर २२.८ आहे. उच्च माध्यमिक स्तरावरील पात्रता असलेल्या आणि २५ वर्षापेक्षा कमी वयोगटातील तरुणांमध्ये बेरोजगारीचा दर २१.४ टक्के इतका आहे. याचाच अर्थ कमी शिकलेल्या पासून पदवीधर असलेल्या तरुणांपर्यंत सर्वांनाच बेरोजगारीचा प्रश्र्न भेडसावत आहे. ही आकडेवारी चिंताजनक आहे. देशातील ४० टक्क्यांहून अधिक तरुण जर बेरोजगार असतील तर त्या तरुणांच्या मानसिकता काय असेल याचा विचार न केलेलाच बरा. शिक्षण आहे, पदवी आहे, काम करण्याची उर्मी आहे, कुटुंबासाठी, देशासाठी काही तरी करुन दाखवण्याची इच्छा आहे मात्र नोकरी नाही अशी अवस्था तरुणांची आहे. नोकरी नसल्याने तरुणांमध्ये प्रचंड नैराश्य आले आहे. आपण इतके शिकूनही आपल्या शिक्षणाचा उपयोग होत नाही त्यामुळे तरुण प्रचंड अस्वस्थ आहेत. शासन रोज नवे परिपत्रक काढून तरुणांचा रोजगार हिरावून घेत आहे. सध्या तर खाजगीकरणाचे पेव फुटले आहे त्यामुळे सरकारी नोकरी मिळवण्याचे तरुणांचे स्वप्न स्वप्नच राहणार आहे. वास्तविक गेल्या अनेक वर्षांपासून सरकारी नोकर भरती झालेली नाही. नोकर भरतीसाठी सरकार जाहिरात काढते. हजारो रुपये परीक्षा फी घेऊन तरुणांची परीक्षा घेते मात्र प्रत्यक्ष नोकरी काही देत नाही. कधी पेपर फुटीचे तर आणखी काही कारण देऊन भरती पुढे ढकलली जाते. शिक्षक भरती हे त्याचे उत्तम उदाहरण. आज सरकारच्या सर्वच खात्यात कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. एक लिपिक चार चार टेबल सांभाळीत आहे, एक शिक्षक चार चार वर्ग शिकवत आहे, गेली अनेक वर्षे पदोन्नती झालेली नाही जर सरकारने सरकारी नोकऱ्यांचे खाजगीकरण करण्याचा निर्णय रद्द करून भरती केली तर देशातील बेरोजगारी काही प्रमाणात का होईना कमी होईल मात्र सरकारला तरुणांच्या रोजगाराचे काहीही देणे घेणे नाही. नोकरी मागायला गेलेल्या तरुणांना राजकीय नेते पकोडे तळा म्हणत त्यांची कुचेष्टा करत आहेत. शिक्षण असून नोकरी नाही, शेती असून शेतात काही पिकत नाही. नोकरी नाही, शेतीही बेभरावशाची झाली आहे, स्वतःचा व्यवसाय करावा म्हटलं तर भांडवल नाही त्यामुळे आजचा तरुण प्रचंड अस्वस्थ आहे. या अस्वस्थतेचा उद्रेक केंव्हाही होऊ शकतो. जर तरुणांच्या अस्वस्थतेचा उद्रेक झाला तर भल्या भल्यांना पळता भुई थोडी होईल म्हणूनच सरकारने तरुणांच्या हाती रोजगार द्यावा. त्यांच्यात असलेल्या ऊर्जेचा राष्ट्रकार्यासाठी उपयोग करून घ्यावा. देशातील बेरोजगारी कमी करण्यासाठी सरकारने ठोस प्रयत्न करावेत.

# सिद्धार्थ खरात बांधावरच नव्हे तर चक्क शेतकऱ्यांच्या सोडीवर

## शेतकऱ्याच्या मेहनतीचा मोल नाही







**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर विधानसभा मतदारसंघाचे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाकडून इच्छुक असलेले उमेदवार सिद्धार्थ खरात हे एक उच्च विद्याविभूषित व्यक्तिमत्व आहे.त्यांनी मंत्रालय सचिव पदावरही काम केलेले आहे, त्यावेळेस गोरगरिबांचे कष्टाचे मोल त्यांनी जाणून गोरगरीब व सर्वसामान्यांना मदत करून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवले आहे. त्यांनी हे उच्च पदाची नोकरी सोडून आता समाजसेवेत मन रमविले आहे. त्यामुळे ते मतदार संघातील गोरगरीब सर्वसामान्यांच्या समस्या जाणून घेत सदर समस्या निकाली लावण्याचा प्रयत्न सतत असतो, अनेक समस्यांना तोंड देत मायबाप शेतकरी करीत असलेल्या कष्टाला मोल नाही. त्यांना किती कष्ट उपसावे लागतात,घामाच्या धारा गाळून शेतमालातून शेतीतून मोती पिकवावे लागतात, तेव्हा त्यांना किती कष्ट सहन करावे लागतात. हे एरवी एसी मधून एकूण येणारे शब्द आता चक्क सिद्धार्थ खरात यांनी शेतातील बांधावरच नव्हे तर शेतकऱ्यांच्या सूडीवर जाऊन मळणी यंत्रामध्ये सोयाबीनचे काड टाकून शेतकऱ्यांच्या मेहनतीचे मोल





समजून घेतले. त्याचबरोबर मायबाप शेतकऱ्यांसोबत आपणही राबल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसून आला.तर उपस्थित शेतकरी बांधवांनी सुद्धा उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेने गटाचे इच्छुक उमेदवार यांचे तोंड भरून कौतुक करीत साहेब असा नेता हवा ज्यांना शेतकऱ्यांच्या कष्टाचे मोल समजले पाहिजे असे बोलून सिद्धार्थ खरात यांना आगामी होऊ घातलेल्या विधानसभा मतदारसंघासाठी आम्ही तुमच्या सोबत राहू आणि तुम्हाला निवडूनही आणू अशी ग्वाही दिली. यावेळी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे इच्छुक उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या याचबरोबर परतीच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली आणि नुकसान झालेल्या नुकसानीचा मोबदला मिळवून देण्यासाठी आपण शासन दरबारी पाठपुरावाही करू अशी ग्वाही देत शेतकऱ्यांचे समाधान केले यावेळी सिद्धार्थ करा यांच्या सोबत उद्धव बाळासाहेब पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते व शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

### गुरुवारी भव्य मोर्चा मोठ्या संख्येने सहभागी व्हा

शेतकऱ्यांच्या समस्या ह्या तुघालकी सरकार समोर मांडण्यासाठी ३ ऑक्टोबर सकाळी ११ वाजता मेहकर तहसीलदार कार्यालयावर भव्य शेतकरी परिवर्तन मोर्चाचे आयोजन करण्यात आहे. तरी आपल्या समस्या मांडण्यासाठी शेतकरी बांधवांनी हजारोंच्या संख्येने या भव्य मोर्चा सहभागी व्हावे असे आव्हान यावेळी देव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे इच्छुक उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी केले.



**देविदास खनपटे**
मुख्य संपादक
९७६७२३३०३४

### शेतकऱ्याचे श्रम आज प्रत्यक्षात अनुभवले : सिद्धार्थ खरात

मांडवा, पारखेड परिसरात सोयाबीन काढणी आणि मळणी शेतकऱ्यांची शेतमजुरांची धामधूम सुरु होती. सोयाबीन थ्रेशर मधून काढण्याची पद्धत स्वतः अनुभवली.मोत्यासारखे चमचमीत दाणे थ्रेसर मधून पडतांना शेतकरी बापाच्या चेहऱ्यावर समाधान असत. त्याच्या श्रमाचं चीज झाल्याची भावना त्याला सुखाऊवन जाते. असे मत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे इच्छुक उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी व्यक्त केले ते शेतकऱ्यांच्या शेतावरच नव्हे तर शेतमाल काढण्यासाठी चुलवर जाऊन शेतकऱ्यांचे कष्ट अनुभवल्यानंतर शेतकऱ्यांशी हिजगुज करताना बोलत होते.

यावेळी ते पुढे म्हणाले की निसर्गाच्या कोपातून महागाईच्या चटक्यातून... रक्ताचं पाणी करून शेतकरी आपलं पीक लेकरासारखं जपतो,तेव्हा आमचं तुमचं पोट भरते. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते तेव्हा सोयाबीनला ७ ते ८ हजार क्विंटल भाव होता. आज तीन वर्षा नंतर अर्धा सुद्धा भाव मिळत आहे. त्यातही त्या मालाचा ओलावा तपासून पिळवणूक सुरु आहे.तर आमदाराचा, खासदारचा, मंत्र्यांचा, अधिकाऱ्याचा, कर्मचाऱ्याचा, पगार तीन वर्षीपूर्वीचाच आहे का? महागाई तुम्हालाचं आहे काय? महागाई शेतकऱ्यांना नाही काय? शेतकऱ्यांना कुटुंब संसार नाही काय?शेतकरी या महाराष्ट्राचा कणा आहे. तो जर मजबूत राहिला तर ह्या तथाकथित विकासाला महत्व आहे. पीक विम्याच्या जाचक अटीत पकडून त्याचा दावा नाकारत आहेत. थातूर मातुर योजना आणून शेतकरांना फसवू पाहत आहे. पण स्वाभिमानी शेतकरी अश्या भुलथापाना आता आता बळी पडणार नाही. असे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले.

# ई-पीक पाहणीसाठी १५ ऑक्टोबरपर्यंत मुतदवाढ

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी** : खरीप हंगामासाठी ई-पीक पाहणीची सुरुवात झाली असून मोबाईल पद्वारे पीक पाहणी नोंदनी करायची आहे. पिक पाहणी नोंदणी करण्यासाठी दि. १५ ऑक्टोबरपर्यंत मुदत वाढ दिली असून शेतकऱ्यांनी विहित मुदतीत ई-पीक पाहणी नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

शासनाचा महत्वाकांक्षी प्रकल्प ई-पीक पाहणीची सुरुवात १ ऑगस्ट २०२४ पासून सुरू झालेली आहे. शेतकरी स्तरावर पिक पाहणी करण्यासाठी अंतीम दि. २३ सप्टेंबर २०२४ पर्यंत होती. सदर नोंदणीला मुदत वाढ दिली असून सर्व शेतकरी बांधवानी नोंदणी करावी. जिल्ह्यात आजपर्यंत ९ लक्ष २५ हजार ६८६ हे.आर. क्षेत्रापैकी ५ लक्ष ७२ हजार २०५ हे. आर क्षेत्रावर तसेच ६ लक्ष ६१ हजार ६४५ खातेदारांपैकी ४ लक्ष ४ हजार ८२२ खातेदारांनी आपल्या पीकांची ई-पीक पाहणी व्हर्जन ३.० या मोबाईल ॲपद्वारे सातबारावर नोंदणी केलेली आहे. आजवर जिल्ह्याची ई-पीक पाहणीची नोंदणी फक्त ७६.३१ टक्के क्षेत्रावर झालेली आहे. तसेच खरीप हंगाम २०२४ डिजिटल क्रॉप सर्वे अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातून निवड झालेल्या बुलढाणा तालुक्यात आजरोजी पर्यंत ५७ हजार ६९४.०१ हे.आर. क्षेत्रापैकी ४५ हजार ९५०.०९ हे. आर क्षेत्रावर खातेदारांनी आपल्या पीकांची ई-पीक पाहणी मोबाईल ॲपद्वारे आपल्या सातबारावर नोंदणी केलेली आहे. आजवर बुलढाणा तालुका डिजिटल क्रॉप सर्वे अंतर्गत ई पीक पाहणीची नोंदणी ७९.६५ टक्के क्षेत्रावर झालेली आहे. उर्वरीत क्षेत्रावर सर्व शेतकरी बांधवांना ई-पीक पाहणी ॲपव्दारे पीकाची नोंदणी करावी.

ई-पीक पाहणीव्दारे पीकांची नोंदणी न केल्यास आपल्या सातबारावर पीक पेरा कोरा राहील. जो नंतर भरता येत नाही. त्यामुळे पीक विमा, इतर शासकीय अनुदान व लाभ मिळविण्यास अडचण निर्माण होईल. यावेळी पाऊस किंवा इतर नैसर्गीक आपत्ती या बाबत पिक विमा मिळण्यासाठी सातबारावर अचूक पीक नोंद असणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व शेतकरी बांधवांनी विहित मुदतीत आपल्या गावच्या तलाठी व सहाय्यक यांचेकडून उर्वरीत क्षेत्राची पीक पाहणी मोबाईल ॲपव्दारे नोंदणी करून घ्यावी, असे उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड यांनी प्रसिद्ध पत्रकाव्दारे कळविले आहे.

### श्रीकांत शिंदेंचा मेहुणा भास्कर जाधवांना भिडणार, वर्षावरची खलबतं संपताच विपुल कदम कामाला लागले

**रत्नागिरी/प्रतिनिधी** : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोकणातील राजकीय घडामोडींना प्रचंड वेग आला आहे. यापैकी गुहागर विधानसभा मतदारसंघ हा सध्या आकर्षणाचा केंद्रबिंदु झाला आहे. कारण, गुहागरमधून खासदार श्रीकांत शिंदे यांचे मेहुणे विपुल कदम यांनी उमेदवारी निश्चित झाल्याची माहिती समोर आली आहे. विपुल कदम यांच्या उमेदवारीमुळे गुहागर विधानसभा क्षेत्रातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे. गुहागर विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी रविवारी वर्षा बंगल्यावर एकनाथ शिंदे यांना भेटायला गेले होते. यावेळी गुहागर विधानसभेसाठी विपुल कदम यांचे नाव निश्चित झाल्याचे समजते.

शिंदे गटाकडून पितृपक्ष संपल्यानंतर विपुल कदम यांची उमेदवारी जाहीर केली जाईल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. मात्र, ही बातमी बाहेर येताच विपुल कदम हे कामाला लागल्याचे दिसत आहे. कारण, विपुल कदम यांच्याकडून गुहागरमध्ये 'धर्मवीर-२' या चित्रपटाचे मोफत खेळ आयोजित करण्यात आले आहेत.

### वरुण धवनच्या पुतणीला सलमान खानचा आसरा, 'सिकंदर'मध्ये साकारणार महत्त्वाची भूमिका

**मुंबई/प्रतिनिधी** : वरुण धवनची पुतणी अंजिनी धवनने नुकतेच बॉलिवूडमध्ये पदार्पण केले आहे. तिचा 'बिन्नी अँड फॅमिली' हा चित्रपट २७ सप्टेंबर रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात पंकज कपूरही दिसला होता. पण हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर काही खास कमाई करू शकला नाही. अंजिनीचा चित्रपट चालला नसेल, पण आता तिचे नशीब चमकणार असल्याचे दिसत आहे. अंजिनीला सलमान खानच्या 'सिकंदर' चित्रपटात एंट्री मिळाली आहे.

मिड डेने आपल्या वृत्तात सूत्रांच्या हवाल्याने म्हटले आहे की, सलमानच्या चित्रपटात अंजिनी धवनला भूमिका देण्यात आली आहे. सूत्राने सांगितले की, तिला चित्रपटातील महत्त्वाच्या भूमिकेसाठी कास्ट करण्यात आले आहे. या पात्रासाठी नव्या चेहऱ्याचा शोध सुरू होता आणि त्यात अंजिनी एकदम फिट बसते. ती लवकरच शूट सुरू करणार आहे.

रिपोर्टमध्ये आणखी एका सूत्राचा हवाला देत असे म्हटले आहे की, अंजिनी धवन या चित्रपटात कोणत्या प्रकारची भूमिका साकारणार आहे आणि सलमान खानसोबत तिच्या पात्राचे नाते काय असेल हे अद्याप कळलेले नाही. मात्र, अंजिनी हा चित्रपटातील महत्त्वाचा दुवा ठरणार आहे, हे नक्की. त्यामुळे निर्मात्यांना तिचे पात्र लपवायचे आहे.

'सिकंदर'मध्ये सलमान खानशिवाय रश्मिका मंदान्ना, सुनील शेट्टी, सत्यराज आणि काजल अग्रवाल हे कलाकार दिसणार आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन एआर मुरुगादास करत आहेत. या वर्षी जूनमध्ये सलमान खानने मुंबईत चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात केली.

# ओला दुष्काळ जाहीर करण्यासाठी स्वाभिमानीची डफडे बचाव व चटणी भाकर आंदोलन

## मागण्या मान्य न केल्यास आणखी तीव्र आंदोलन करू: स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा इशारा

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/विशेष प्रतिनिधी** : गेल्या महिन्याभरापासून सुरू असलेल्या संततधार पावसाने पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे लागवडीचा खर्चही निघणे शक्य नाही, परिणामी शेतकऱ्यावर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीतून शेतकऱ्यांना सावरण्यासाठी नमस्कार भागाचे तात्काळ पंचनामे करून आर्थिक मदत करावी, तसेच खामगाव तालुका ओला दुष्काळ म्हणून जाहीर करावा या मागण्यासाठी शेतकरी स्वाभिमानी संघटनेच्या संघटनेचे जिल्हाध्यक्ष अमोल पाटील यांच्या नेतृत्वात ३० सप्टेंबर रोजी खामगाव येथील उपविभागीय अधिकारी कार्यालय समोर डफडे बजाव व चटणी भाकर आंदोलन करण्यात आले.





राज्यभरासह खामगाव तालुक्यात गेल्या महिनाभरापासून संत दार पाऊस सुरू असल्याने व अतिवृष्टीमुळे सोयाबीन, मूग, उडीद, तीळ पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे. या नैसर्गिक आपत्ती मुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याची गरज असताना शासनाने अद्यापही नुकसानीचे पंचनामे केले नाहीत त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे.

अतिवृष्टी मुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून भरीव मदत शेतकऱ्याच्या खात्यात जमा करण्यात यावी व खामगाव तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, या विविध मागण्यांसाठी ३० सप्टेंबर रोजी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने खामगाव येथील उपविभागीय कार्यालयासमोर डफडे बजाव तसेच चटणी भाकर खाऊन शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलन करण्यात आले आहे. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी तसेच तालुक्यातील शेतकरी शेतकरी यांचे हजाराच्या संख्येने उपस्थित होती.

> यावर्षी संततदार पाऊस व मधल्या काळात अतिवृष्टी झाल्याने पिकांचे पूर्णतः नुकसान झाले आहे या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत द्यावी. मायबाप शासनाने याकडे लक्ष द्यावे.
>
> **- विनायक दाणे,**
> **शेतकरी**

> शेतकरी स्वाभिमानी संघटना ही शेतकऱ्यांचे हित जोपासणारी संघटना आहे. शेतकऱ्यांच्या न्यायासाठी आम्ही नेहमीच रस्त्यावर उतरलो आहे. तालुक्यात अतिवृष्टी झाल्याने पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे, असे असताना अद्याप शेतकऱ्यांना मदत जाहीर करण्यात आले नाही. शेतकऱ्यांना तात्काळ मदत जाहीर करावी, सरसकट मदत द्यावी अन्यथा स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल.
>
> **-अमोल पाटील,**
> **जिल्हाध्यक्ष स्वाभिमानी शेतकरी संघटना.**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### बारामती मधील नामांकित कॉलेजच्या आवारात विद्यार्थ्यांची निर्घृणपणे हत्या





दैनिक आपला विदर्भ

**बारामती/प्रतिनिधी :** पुणे शहरापाठोपाठ विद्येचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या बारामतीतील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील बारावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा त्याच्याच वर्गातील दुसऱ्या विद्यार्थ्याने कोयत्याने वार करून खून केल्याचा धक्कादायक प्रकार आज सकाळी बारामतीत घडला. या प्रकारामुळे बारामती परिसरात मोठी घबराट पसरली आहे.मागील काही दिवसांपासून कोयत्याचं लोन महाराष्ट्रभर पसरलं आहे. ते मागील काही दिवसात बारामतीत पोचले असून,बारामतीतही कोयता अनेक घटना घडल्या असून अनेकांना जीव गमवावा लागल्याच्या घटना घडल्या आहेत.बारामती सारख्या शांतता प्रिय शहरात अशा घटना घडत असल्याने नागरिकांमधून चिंता व्यक्त केली जात आहे.याबाबत या घटनेतील अल्पव्य तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतली असल्याची माहिती अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार यांनी दिली..

### विक्रीस आणलेले पाच पिस्टल व काडतुसे पुणे ग्रामीण पोलिसांनी केले जप्त




दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे ग्रामीण पोलिसांच्या हद्दीत असणाऱ्या शिरूर बायपास जवळ दोन आरोपींकडून पाच गावठी पिस्तूल व चार जिवंत काडतुसे असे एकूण १ लाख २ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. शिरूर बायपास जवळ एका हॉटेल शेजारी दोन जणांकडे अनधिकृत शस्त्र असल्याची माहिती पुणे ग्रामीण पोलिसांना मिळाली. त्यानुसार पुणे ग्रामीण पोलिसांनी तातडीने त्या ठिकाणी कारवाई केली असता दोन आरोपींना अटक करून त्यांच्याकडून पाच गावठी पिस्तूल व चार जिवंत काडतुसे जप्त करण्यात आले. यामध्ये अनिकेत गव्हाणे व मंगेश खोपटे अशा दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले. याबाबतचा तपास केल्यावर हे गावठी पिस्तूलची विक्री करून जास्त पैसे कमवण्याच्या उद्देशाने त्यांनी हे केल्या असल्याचे सांगितले. मध्य प्रदेश येथील सेंधवा येथून एक महिन्यापूर्वी पाच पिस्तूल त्यांनी आणले होते. दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन पटील तपास पोलीस करत आहेत.

### धक्कादायक! सिनेमा पाहताना चाहत्याचा मृत्यू, थिएटरमधील CCTV Video ने खळबळ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** नवे कोरे सिनेमे थिएटरमध्ये प्रदर्शित होत असतात. प्रेक्षकही आपल्या आवडत्या अभिनेता, अभिनेत्रींचे सिनेमे पाहण्यासाठी आवर्जून थिएटरमध्ये जातात. त्यामुळे नवीन कोणता सिनेमा थिएटरमध्ये दाखल झाला की लगेच गर्दी व्हायला सुरुवात होती. अशातच नुकताच जान्हवी कपूर आणि ज्युनियर एनटीआरचा 'देवरा' सिनेमा रिलीज झाला आहे. मात्र हा सिनेमा पाहताना एका चाहत्यासोबत भयानक घडलं. त्याचा सिनेमा पाहताना जीव गेला.

'देवरा' सिनेमा नुकताच प्रदर्शित झाला असून हा सिनेमा पाहण्यासाठी चाहते थिएटरमध्ये गर्दी करत आहेत. मात्र हा सिनेमा पाहताना एका चाहत्याचा थिएटरमध्ये मृत्यू झाला. या घटनेचा सीसीटीव्ही व्हायरल होत आहे. या घटनेने सध्या एकच खळबळ उडाली आहे.

आंध्रप्रदेशमध्ये ही घटना घडल्याचे समोर आले आहे. 'देवरा' सिनेमा पाहताना एका चाहत्याचे निधन झाले. मृत्यू झालेल्या या चाहत्याचे नाव मस्तान आहे. सिनेमा पाहत असताना त्याला अचानक हृदयविकाराचा झटका आला आणि तो जमिनीवर बेशुद्ध झाला. त्याला तात्काळ हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. मात्र उशीर झाला आणि मस्तानचा मृत्यू झाला. या घटनेचा सीसीटीव्ही समोर आलाय. व्हिडिओमध्ये दिसतंय की, थिएटरमध्ये पोलिस दिसत आहेत.

दरम्यान, सिनेमा पाहताना हृदयविकाराचा झटका येण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वीही अशा अनेक घटना समोर आल्या आहेत. सिनेमा पाहताना यापूर्वीही हृदयविकाराच्या झटक्याने अनेकांना जीव गमवावा लागला आहे.

# लोणार येथे २२० के व्ही वीज उपकेंद्राची निविदा प्रक्रिया सुरू

## व्यवस्थापकीय संचालक अरविंद भादीकर यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** विजेचा निर्माण होणारा तुटवडा लक्षात घेता तसेच आमदार संजय रायमुलकर यांनी केलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळे लोणार येथे २२० के व्ही वीज उपकेंद्राच्या उभारणीसाठीच्या निविदा प्रक्रियेला प्रारंभ झाला आहे.अशी माहिती वीज वितरण कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक अरविंद भादीकर यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या मुंबई मुख्यालयात आ. संजय रायमुलकर यांनी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक अरविंद भादीकर यांची भेट घेऊन मेहकर मतदारसंघातील विज समस्यांवर तसेच इतर समस्या निकाली काढण्यावर चर्चा केली असता, व्यवस्थापकीय संचालक अरविंद भादीकर यांनी लोणार येथील वीज उपकेंद्र त्वरित सुरू करणे, त्याचप्रमाणे खामगाव येथील विभागीय कार्यालयाचे विभाजन करून मेहकर, लोणार, सिंदखेडराजा तालुक्यांसाठी वेगळे विभागीय कार्यालय सुरू करण्याबाबत लवकरच निर्णय होणार असल्याचे सांगितले.

तसेच लोणार येथील २२० के व्ही वीज उपकेंद्राची मागणी मंजूर करण्यात आली असून त्याची निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.





इतर समस्या ही लवकरच निकाली काढण्यात येतील अशी माहिती अरविंद भादीकर यांनी रायमुलकर यांना दिली. तर आमदार संजय रायमुलकर यांनी खामगाव येथे वीज कंपनीचे विभागीय कार्यालय असून त्या अंतर्गत २७ वितरण केंद्र, सहा उपविभाग, ३९ उपकेंद्र व ४९२ खेडी असून अडीच लाख वीस ग्राहक आहेत.

भौगोलिक परिस्थिती पाहता या विभागीय कार्यालयाचे मोठे कार्यक्षेत्र असून त्यामुळे ग्राहकांना सेवा पुरविण्यात अडचणी निर्माण होत आहेत, दूरच्या तालुक्यातील ग्राहकांना आपल्या अडचणी सोडून घेण्यात अडचण येते. मेहकर येथे विभागीय कार्यालय सुरू करण्याचा मे. क्रिसिल यांनी निश्रि्चत केलेल्या मानकानुसारचा प्रस्ताव तयार करून फार पूर्वीच अकोला परिमंडळ कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे .त्यांनी तो प्रादेशिक संचालक नागपूर यांच्यामार्फत शासनाकडे सादर केला आहे. त्यासही मान्यता देण्याची मागणी संजय रायमुलकर यांनी व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडे केली असता याबाबतची प्रक्रिया सुरु असल्याचे भादीकर यांनी सांगितले.

> मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे पाठपुरावा सुरू आहे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडेही सदर मागणी करण्यात आली असून त्यांनी याबाबतची कार्यवाही त्वरित करण्याचे आदेश संबंधितांना दिले आहेत. मतदार संघातील समस्या तात्काळ मार्गी लागाव्या यासाठी सतत पाठपुरावा सुरू आहे.
> **– संजय रायमुलकर, आमदार**

# आम्ही कोणाकडे जाणार नाही : प्रकाश आंबेडकर

दैनिक आपला विदर्भ



**बुलडाणा/प्रतिनिधी :** लोकसभेत युती फिस्कटल्यानंतर आता आम्ही कोणाकडे युती करण्यासाठी जाणार नाही ज्यांना आमच्या सोबत युती करायची ते आमच्याकडे येतील असे मत वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांनी व्यक्त केले. ते चोपडा येथे आदिवासी सत्ता संपादन सभे निमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी आदिवासी आप पक्षाचे राष्ट्रीय नेते तसेच रावेर विधानसभेचे उमेदवार सेमीभा पाटील, चोपडा विधानसभेचे इच्छुक उमेदवार सुनील गायकवाड यांची उपस्थिती प्रमुख होती. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर म्हणाले की, लोकसभेत शिवसेना उद्धव ठाकरे गटासोबत युती तुटल्यानंतर विधानसभेत पुन्हा युती होणार अशी चर्चा राज्यात होत आहे. परंतु ज्यांना आमच्या सोबत युती करायची आहे.ते आमच्याकडे येतील आम्ही कुणाकडे जाणार नाही. सध्या कोणासोबत युती संदर्भात कोणासोबत ही बोलणे झाले नाही किंवा चालू ह नाही, ज्यांना युती करायचे ते आमच्याकडे प्रस्ताव मांडतील त्यानंतर आम्ही त्यावर विचार करू सकारात्मक तोडगा निघाला तर युती करू अन्यथा आम्ही स्वबळावर लढण्यास तयार आहे. आमची तशी तयारी सुद्धा चालू आहे.यावेळी वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. बाळासाहेब आंबेडकर यांच्या या वक्तव्याने मात्र जिल्ह्यासह राज्यातील राजकारणात मात्र आता उलट सुलट चर्चा सुरू झाली आहे. वंचित बहुजन आघाडी आता कोणासोबत चर्चा करणार याबाबत तर्कवितर्क लावले जात आहेत.

# बचत गट प्रदर्शनीचे बॅनर फाडणाऱ्यांवर गन्हा दाखल करा

## काँग्रेस कमिटी प्रदेश सचिव ॲड.शेळके यांचे पोलीस अधीक्षकांना निवेदन




दैनिक आपला विदर्भ

***बुलडाणा/विशेष प्रतिनिधी :*** *जिल्हास्तरीय महिला उद्योजक तथा बचत गट प्रदर्शनीच्या प्रसिद्धीसाठी महिला उद्योजक व बचत गट गटाच्या वतीने बुलढाणा शहरात विविध ठिकाणी बॅनर लावण्यात आले. मात्र सदर बॅनर हे अज्ञात समाजकंटकांनी फाडले आहेत. तरी आपण शहरातील बॅनर फाडणाऱ्या समाजकंटकाचा शोध घेऊन दोषीवर कारवाई करावी, गुन्हे दाखल करावे, अशी मागणी काँग्रेस कमिटीच्या महाराष्ट्र प्रदेश सचिव तथा जिल्हा परिषद सदस्य ॲड्. जयश्री सुनील शेळके यांनी बुलढाणा जिल्हा पोलीस अधीक्षक यांना दि. ३० सप्टेंबर २०२४ रोजी निवेदनाद्वारे केली आहे.*



*काँग्रेस कमिटीच्या महाराष्ट्र प्रदेश सचिव तथा जिल्हा परिषद सदस्य ॲड्. जयश्री शेळके यांनी पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, दिशा बुलडाणा जिल्हा महिला बचतगट फेडरेशन द्वारा दि.४,५ व ६ ऑक्टोबर २०२४ रोजी जारी साईनमॉल –ठऊ मागे, बुलढाणा अर्बन रेसिडेन्सी समोर बुलढाणा येथील मैदानात जिल्हास्तरीय महिला उद्योजक तथा बचत गट प्रदर्शनीचे आयोजन करण्याचे ठरले आहे.*

*या प्रदर्शनीला राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे, शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे, महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाखे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहेत. तसेच जिल्हाभरातून हजारोच्या संख्येने महिला उपस्थित राहणार आहेत. त्याचबरोबर दोनशेहून अधिक बचत गट आपले स्टॉल लावणार आहेत. यावेळी महिलांच्या स्नेहमिलन सोहळ्याचा कार्यक्रम सुध्दा आयोजित करण्यात आला आहे.*

*या कार्यक्रमाच्या प्रसिध्दीसाठी बुलढाणा शहरासह संपूर्ण बुलढाणा विधानसभा मतदार संघामध्ये प्रदर्शनीचे बॅनर लावले आहेत. अनेक ठिकाणी या प्रदर्शनीचे बॅनर फाडण्याचा, चोरुन नेण्याचा तसेच लावलेल्या बॅनरवर दुसऱ्या कार्यक्रमाचे बॅनर लावण्याचा प्रकार घडला आहे. ह्या सर्व घटना जाणिवपुर्वक आणि राजकिय द्वेषातून झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आपण या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने चौकशी करावी. बुलडाणा शहरातील संगम चौक आणि धाड नाका येथे लावण्यात आलेले प्रदर्शनीचे बॅनर फाटले आहेत. या भागातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पडताळणी करुन दोषींवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी काँग्रेस कमिटीच्या महाराष्ट्र प्रदेश सचिव तथा जिल्हा परिषद सदस्य ॲड. जयश्री सुनील शेळके यांनी बुलढाणा जिल्हा पोलीस अधीक्षक यांना दिनांक ३० सप्टेंबर २०२४ रोजी निवेदनाद्वारे केली आहे.*

# मुंब्रा येथील पाणी प्रश्नावर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे बेमुदत धरणे आंदोलन




दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाणे महानगर पालिकेवर सध्या राज्य सरकारचा हस्तक्षेप वाढीस लागला आहे. त्यामुळेच विरोधकांचे प्राबल्य असलेल्या विभागाबाबत दुजाभाव केला जात आहे. त्याचाच एक भाग म्हणजे मुंब्र्यातील पाणीपुरवठ्यात अन्याय केला जात आहे, असे बोलत डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या मार्गदर्शनानुसार माजी विरोधीपक्ष नेते शानू पठाण यांच्या नेतृत्वाखाली सोमवारपासून बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

यावेळी पाण्याचा काळाबाजार करणाऱ्यांना मोक्का लावा, अशी मागणी पठाण यांनी केली आहे. मुंब्रा भागात गेल्या काही दिवसांपासून पाण्याचा अत्यल्प पुरवठा केला जात आहे. मागणी करूनही पाणीपुरवठा वाढविण्यात येत नाही. तसेच, कचरादेखील उचलण्यात येत नाही. या निषेधार्थ ठाणे महापालिकेच्या मुंब्रा येथील पाणीपुरवठा विभागासमोर हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. या आंदोलनात मोठ्या संख्येने महिला, पुरुष आणि लहान मुले सहभागी झाले आहेत.

या आंदोलकांकडून ठाणे पालिकेवर भेदभाव केला जात असल्याचा आरोप केला जात आहे. गेल्या १५ दिवसांपासून ३-३ दिवस पाणीपुरवठाच करण्यात येत नाही. काही ठिकाणी पाणी माफियांकडून पंप लावून पाणी खेचले जात आहे. टँकर माफिया खुलेआम पाण्याची विक्री करीत आहेत. विकण्यासाठी पाणी आहे.

मात्र, गोरगरीबांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. दुसरीकडे कचरा उचलण्यासाठी कोट्यवधींचे ठेके दिले जात आहेत. शहराच्या विविध भागातील कचरा हटवण्यात येत नाही. अगदी मंदिराच्या आवारातील, मंदिर परिसरातील शाळेजवळील कचराही उचलण्यात येत नाही. परिणामी, मुंब्रा , कौसा भागात साथीच्या आजारांचा प्रचंड फैलाव झालेला आहे. ठामपाची निवडणूक झालेली नसल्याने ठाणे पालिकेचा कारभार राज्य सरकारच्या निर्देशानुसार चालत आहे. त्यातूनच मुंब्र्यावर अन्याय केला जात आहे. पण, आम्ही हा अन्याय सहन करणार नाही. त्याविरोधात संघर्ष करू. जर आम्हाला योग्य पाणीपुरवठा आणि नागरी सुविधा दिल्या नाहीत. तर आम्ही पालिका मुख्यालयात घेराव आंदोलन करू अशी प्रतिक्रिया माजी विरोधी पक्ष नेतेशानू पठाण यांनी दिली आहे.

# शिवसेना उबाठा गटाचा कार्यकर्ता मेळावा सदस्य नोंदणी व गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** यवतमाळ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचा कार्यकर्ता मेळावा सदस्य नोंदणी व गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याचे आयोजन यवतमाळ येथे दिनांक २९ सप्टेंबर २०२४ रविवार रोजी राजवाडा पार्क भोसा रोड येथे मा खासदार संजय देशमुख यांच्या अध्क्षतेखाली करण्यात आले होते.

या वेळी. प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना प्रमुख राजेंद्र गायकवाड, सागरताई पुरी, किशोर इंगळे, जिल्हा प्रमुख संतोष ढवळे आणि यवतमाळ शहर प्रमुख विनोद पवार, कल्पना दरवई, गजानन ठोकाळे, सय्यद दाऊद भाई अल्पसंख्याक जिल्हाप्रमुख, अशिफ आली काजी उपजिल्हाप्रमुख, भाई अमान सामाजिक कार्यकर्ता. डॉ. गणेश नाईक, राजेश निमोदीया, संदीप सरोदे उपतालुकाप्रमुख, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला तसेच नवीन सभासद नोंदणी करण्यात आली.

तसेच येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत चांगल्या प्रकारे विजय मिळावा या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते तसेच उपस्थित मान्यवरांनी शिवसेनेच्या कार्यकरत्यांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राधिका चव्हाण, सचिन पिल्लेवर, गजानन अवदलकर, मनीषा बुटले, संजय रंगे, शोयाब शहा, छोटू पठाण, सुनील पवार, शेख नईम, दत्ता सूर्यावंशी नितीन सोळंकी, आशिम पठाण, सोयेब बेग, यांनी परिश्रम घेतले. यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते



## विविध वृत्त...

### व्यापारी महासंघाचे खा. धोत्रे यांना निवेदन



खासदार धोत्रे यांचा सत्कार करत असताना व्यापारी महासंघाचे पदाधिकारी

दैनिक आपला विदर्भ

**दिग्रस/प्रतिनिधी :** येथील व्यापारी महासंघाची खासदार अनुप धोत्रे यांच्यासोबत येथील बालाजी लॉन येथे नुकतीच बैठक पार पडली विस्तृत चर्चेनंतर व्यापारी महासंघाने विविध मागण्या व समस्या बाबत खासदार धोत्रे यांना निवेदन दिले.

निवेदनामध्ये नमूद करण्यात आले आहे की, दर महिन्याला शहरातील सर्व व्यापारी बांधवांची सभा आयोजित केल्या जाते तसेच दिवाळी मिलन व इतर कार्यक्रम आयोजित केले जातात त्याकरिता व्यापारी भावनाची आवश्यकता आहे तरी आपण आपल्या स्तरावर व्यापारी भवना करीता निधी उपलब्ध करून द्यावा.तसेच तालुक्यात विविध उद्योग धंदे वाढविण्यासाठी व तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा याकरिता तालुक्यात एमआयडीसी ची आवश्यकता आहे त्याकरिता आपण आपल्या स्तरावरून कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे शहरातील वाढती वाहतूक पाहता रिसोड शहराकरिता लोणार वाशिम, मेहकर हिंगोली या रस्त्यावरील वाहतूक शहराबाहेरून जाण्याकरिता बायपास रोड करण्यात यावा अशा मागण्यांचे निवेदन देण्यात आले यावेळी खा धोत्रे यांच्यासोबत एडवोकेट नकुल देशमुख गजाननराव लाटे, स्वप्निल सरनाईक, सुभाषराव खरात उपस्थित होते.

निवेदनावर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष मदन सेठ बगडिया ,उपाध्यक्ष सारंग जिरवणकर, नंदकिशोर झवर, सचिव गणेश बगडीया, यांच्या स्वाक्षऱ्या आहेत यावेळी व्यापारी महासंघाचे सर्व पदाधिकारी व सदस्य, संत अमरदास बाबा संस्थानचे अध्यक्ष माझोडकर व सर्व सदस्य व पत्रकार बांधव उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रस्ताविक संचलन व आभार प्रदर्शन नंदकिशोर झवर यांनी केले.

### बुलढाण्यात आदिवासी बांधवांचा रास्तारोको




दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/विशेष प्रतिनिधी :** आदिवासी जमाती मधून धनगर समाजाला आरक्षण देण्यात येऊ नये या मागणीसाठी आदिवासी समाजाच्या वतीने बुलढाणा येथे ३० सप्टेंबर रोजी रास्ता रोको आंदोलन करून आदिवासी मधून धनगर समाजाला देण्यात येणाऱ्या आरक्षणाला तीव्र विरोध केला.

धनगर समाजाला आदिवासी जमातीमध्ये समाविष्ट करु नये, या मागणीसाठी आज बुलढाण्यातील जयस्तंभ चौकात आदिवासी बांधवांनी ३० सप्टेंबर रोजी रास्तारोको आंदोलन करून धनगर समाजाला आदिवासी मधून देण्यात येणारे आरक्षणाला तीव्र विरोध केला. यावेळी धनगर समाज हा धनगड या जमातीच्या नावाचा गैरफायदा घेत गेल्या अनेक वर्षांपासून वेळोवेळी मोर्चे, आंदोलन, उपोषण करुन धनगर समाजाला आदिवासीमध्ये समाविष्ट करण्यात यावे,अशी मागणी करत आहे. मुख्यमंत्री यांनी धनगर समाजाला आदिवासीमध्ये समाविष्ट करण्यात येणार असल्याचा जीआर काढण्याचे सांगत तमाम महाराष्ट्रातील आदिवासी समाजाच्या भावनेशी खेळणारा असा निर्णय घेतला आहे. हा निर्णय तात्काळ मागे घेण्यात यावा, यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील आदिवासी बांधवांनी बुलढाणा येथील जयस्तंभ चौकात ३० सप्टेंबर रोजी रास्तारोको आंदोलन केले. यावेळी राज्य सरकार विरोधात घोषणाबाजी सुद्धा करण्यात आली आहे. तसेच आदिवासी समाजामधून धनगर समाजाला आरक्षण दिल्यास यापुढे संपूर्ण महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन करू,असा इशाराही यावेळी या आंदोलनात समाजबांधवांच्या वतीने देण्यात आला आहे.

### माजी सैनिक व विधवांच्या पाल्यांसाठी प्रधानमंत्री शिष्यवृत्ती योजना; ३० नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागविले

**बुलडाणा/प्रतिनिधी :** माजी सैनिक, विधवांच्या पाल्यांसाठी प्रधानमंत्री शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज ु.ङ्मील. र्सीं.ळप या वेबसाईटवर उपलब्ध असून अर्ज भरण्याची अंतिम तारीख ३० नोव्हेंबर २०२४ आहे. तरी जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक, विधवा पत्नी, युध्द विधवा यांनी प्रधानमंत्री शिष्यवृत्ती योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

### केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचा जिल्हा दौरा

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव बुलडाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

त्यांच्या दौऱ्यानुसार दि. १ ऑक्टोंबर २०२४ रोजी सकाळी ५.१३ वाजता जालना येथून मेहकरकडे प्रस्थान. सकाळी ९.३० वाजता शिवाजी नगर, मेहकर येथुन बुलढाणाकडे प्रस्थान. सकाळी ११ वाजता बुलढाणा अर्बन रेसिडेन्सी क्लब सेलिब्रेशन, मलकापूर रोड येथे आयुष्यमान संवाद मेळाव्याचे उद्घाटन कार्यक्रमास उपस्थिती. सोयीनुसार मेहकरकडे प्रस्थान, आगमन व राखीव.

# आमदाराच्या मध्यस्थीने उपोषणाची सांगता

## उपोषण केल्यावरच न्याय मिळणार का नागरिकांचा संवाल

**मेहकर/प्रतिनिधी :** चोरीस गेलेल्या पशुधनाचा शोध घेण्यास पोलीस प्रशासन दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे पोलीस प्रशासनाच्या या निष्काळजीपणाच्या विरोधात जानेफळ येथील पशुधन मालकांनी दिनांक २७ सप्टेंबर पासून पोलीस स्टेशन समोर चोरी गेलेल्या मुद्दमालाचा शोध लावावा व आरोपीला अटक करावी, या मागणीसाठी उपोषण सुरू केले होते.



या उपोषणाची आ. संजय रायमुलकर यांच्या मध्यस्थीने व पोलीस प्रशासनाच्या लेखी आश्र्वासनाने दि.३० सप्टेंबर रोजी सांगता करण्यात आली. जानेफळ येथील अंबिका नगर मधील अल्पभूधारक शेतकर्यांच्या दि.२५ सप्टेंबर रोजी मध्यरात्री अज्ञात चोरट्याने दोन ठिकाणाहून २ लाख ११ हजार ५०० रुपये किंमतीच्या तीन म्हशी व वगारू चोरून नेल्याबाबत दाखल फिर्यादीवरून जानेफळ पोलिस स्टेशनमध्ये अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.मात्र, या चोरीचा तपास लावण्यात पोलिस प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने तसेच यापूर्वी सुद्धा जानेफळ पोलीस स्टेशनमध्ये अज्ञात चोरट्याने गोधनाची चोरी गेलेल्या घटनांचा तपास करण्यास पोलिस प्रशसानाने अक्षम्य दुर्लक्ष केल्याने चोरट्याचे मनोधैर्य वाढले असा आरोप करीत या चोरीच्या घटनांना आळा घालावा, चोरीच्या घटनेचा शोध तात्काळ घेऊन चोरट्यांना अटक करावी, या मागणीसाठी जानेफळ पोलिस स्टेशन समोर दि.२७ सप्टेंबरपासून विजय काळे व संदीप नवले यांनी बेमुदत उपोषण सुरू केले होते.

या उपोषणकर्त्यांना पोलीस प्रशासनाच्या वतीने चोरीस गेलेला मुद्देमालाचा व आरोपी यांचा शोध घेण्याचे संबंधाने गुन्ह्यांचा तपास सुरू करण्यात सुध्दा आलेला आहे. तसेच सदर प्रकरणाबाबत स्थानिक गुन्हे शाखा बुलढाणा यांना पत्र व्यवहार करण्यात आलेला असुन वरिष्ठांना माहिती देण्यात आली आहे. तसेच एक पोलीस पथक सुध्दा नेमण्यात आले आहे.

सदर गुन्ह्यांतील चोरी गेलेल्या मुद्देमाल व आरोपी संबंधीत योग्य रितीने सखोल तपास करून गुन्ह्यांची १५ दिवसाचे आत उकल करण्याचे दृष्टीने आपणास सर्वोतोपरी न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येईल असे लेखी आश्र्वासन पत्राद्वारे दिले.त्यानंतर सदर उपषणाची सांगता आ. डॉ.संजय रायमुलकर यांच्या मध्यस्थीने दिनांक ३० सप्टेंबर २०२४ रोजी करण्यात आली आहे.

### उपोषण केल्यानंतरच शोध लागेल का

जानेफळ पोलीस स्टेशन अंतर्गत अनेक प्रकरणांचा शोध घेण्यास पोलिसांना यश आले नाही. तर सदर प्रकरणाकडे पोलीस प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आले..?त्यामुळे घटनांतील चोरी गेलेला मुद्देमाल व चोरट्यास अटक करण्यास पोलीस प्रशासनाला अपयश आले आहे. चोरी गेलेला मुद्देमाल परत मिळवण्यासाठी प्रत्येक तक्रारदाराला उपोषण करावे लागेल का असा प्रश्न जनतेमध्ये उपस्थित केल्या जात आहे. उपोषण केल्यानंतरच पोलीस प्रशासन सदर प्रकरणाचा तपास लावण्याचे लेखी आश्र्वासन देत असेल तर प्रत्येक तक्रारदाराला उपोषण करावे लागेल अशी चर्चा होत असून पोलीस प्रशासनाच्या या अजब गजब कारभाराबाबत मात्र आश्र्चर्य व्यक्त केल्या जात आहे.

-----------------------------------

### उत्सव साजरा करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावे

**बुलडाणा/प्रतिनिधी :** आगामी सन उत्सव साजरा करण्यासाठी सार्वजनिक विशस्त व्यवस्था अधिनियमानुसार परवानगी घेणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने सण उत्सव साजरा करण्यासाठी नागरिकांनी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावा, असे आवाहन सहायक धर्मदाय आयुक्त दु.के. साहू यांनी केले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विशस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम ४१-क अन्वये दुर्गाउत्सव ,जयंती उत्सव व इतर उत्सव साजरा करण्यासाठी आवश्यक परवानगी अर्ज धर्मादाय आयुक्त यांच्या www.charity.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने करावा. अर्ज करण्याची पध्दत, अपलोड करावयाची कागदपत्रांची यादी इत्यादी माहिती वेबसाईटवर मार्गदर्शक सदराखाली ४१-क परवानगी या शिर्षकात सविस्तर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. ऑनलाईन अर्ज करण्यासाठी कागदपत्रे- ठरावाची प्रत, जागा मालकाचे ना-हरकत पत्र, पत्याचा पुरावा म्हणून लाईट बिलची मूळ प्रत व आधारकार्डची प्रत असणे आवश्यक(सबंधित ग्रामपंचायत, नगर परिषद यांची परवानगी). पदाधिकाऱ्यांचे ओळखपत्र(आधारकार्ड, पॅनकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र इ.), मागील वर्षाचा हिशोब, मागील वर्षी घेण्यात आलेल्या परवानगीची प्रत, परवानगी मिळणेकरिता वरिल कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे. संकेतस्थळावर विहित कागदपत्रांसह ऑनलाईन अर्ज केल्यास परवानगीची प्रत ई-मेलव्दारे प्राप्त होण्याची सुविधा उपलब्ध आहे. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्यास अडचणी येत असल्यास त्यांनी ऑफलाईन पद्धतीने अर्ज सादर करावा.

## बुलढाणा येथे १ ऑक्टोबरला आयुष्यमान संवाद कार्यक्रमाचे आयोजन

### केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव आणि आरोग्यमंत्री तानाजी सावंत करणार मार्गदर्शन

**बुलडाणा/प्रतिनिधी :** केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध आरोग्यदायी योजनेची माहिती सर्वसामान्य जनतेला होण्याच्या दृष्टिकोनातून बुलढाणा येथे १ ऑक्टोबरला आयुष्यमान संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे या कार्यक्रमाला केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि राज्याचे आरोग्य मंत्री तानाजी सावंत मार्गदर्शन करणार आहेत.

सर्वसामान्य जनतेला मोफत आरोग्यसेवा मिळावी या दृष्टिकोनातून केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या वतीने विविध योजना राबविण्यात येतात यामध्ये प्रधानमंत्री जन आरोग्य योजना महात्मा फुले जन आरोग्य योजना यांचे एकत्रित आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत सर्वसामान्यांना मोफत आरोग्य उपचार देण्यात येतो आयुष्मान भारत योजनेअंतर्गत पाच लाखापर्यंतची मदत रुग्णांना औषधी उपचारासाठी केली जाते या योजने संदर्भातील माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचण्याच्या दृष्टिकोनातून बुलढाणा येथे १ ऑक्टोबरला बुलढाणा रेसिडेन्सी येथे आयुष्यमान संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं आहे.



या कार्यक्रमाला केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव केंद्रीय युवक कल्याण राज्यमंत्री रक्षाताई खडसे बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री दिलीप वळसे पाटील राज्याचे आरोग्य मंत्री तानाजी सावंत आमदार डॉ राजेंद्र शिंगणे आमदार डॉ संजय कोटे आमदार डॉ संजय रायमुलकर आमदार आकाश फुंडकर आमदार संजय गायकवाड आमदार श्र्वेताताई महाले आमदार राजेश एकडे अमरावती विभागीय आयुक्त डॉ निधी पांण्डेय आरोग्य विभागाचे अप्पर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर आरोग्य विभागाचे आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य विभागाचे संचालक श्रीरंगा नाईक राज्याचे आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण आरोग्य विभागाचे उपसंचालक डॉ कमलेश भंडारी जिल्हाधिकारी डॉ किराण पाटील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यपालन अधिकारी गुलाबराव खरात उपस्थित राहणार आहे आयुष्मान भारत योजने संदर्भात मार्गदर्शन मान्यवर करणार असून आयुष्मान भारत योजनेतील लाभार्थ्यांसोबत ही संवाद साधलेल्या जाणार आहे.

या कार्यक्रमादरम्यान आयुष्मान भारत योजनेच्या कार्डचाही वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यत येणार आहे या कार्यक्रमाला नागरिकांनी उपस्थित राहावे अस आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ भागवत भुसारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ अमोल गीते यांनी केले आहे.

## वसंतराव नाईक कनिष्ठ महाविद्यालय बिबीचे विद्यार्थी कबड्डी स्पर्धेत जिल्ह्यातून प्रथम

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार :** ३० सप्टेंबर रोजी खामगाव येथे शालेय अंडर १९ जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्यामध्ये बिबी येथील वसंतराव नाईक कनिष्ठ महाविद्यालयातील कबड्डीच्या संघाने जोरदार असा खेळ खेळून जिल्ह्यात सर्वात प्रथम येण्याचा व आता विभागीय स्तरावर निवड झाल्याचा बहुमान मिळविला आहे.



ए.के. नॅशनल हायस्कूल खामगाव येथे ३० सप्टेंबर रोजी घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय शालेय अंडर १९ कबड्डी स्पर्धेत बिबी येथील वसंतराव नाईक कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये मंगेश जाधव यांच्या नेतृत्वात शुभम चव्हाण गौरव चव्हाण,योगेश राठोड गणेश जाधव करण पवार उमेश जाधव सुनील राठोड सचिन चव्हाण सुनील चव्हाण अजय जाधव या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन कबड्डी मध्ये अतिशय उत्कृष्ट कामगिरी बजावून घवघवीत यश मिळविले व त्यांची अमरावती विभागीयस्तरीय कबड्डीस्पर्धा खेळण्यासाठी निवड झाली आहे, या बद्दल वसंतराव नाईक महाविद्यालयाचे सचिव अभयदादा चव्हाण, प्राचार्य ठ.इ.राठोड, क्रीडा शिक्षक तथा उपप्राचार्य ड.ठ. राठोड, भुतेकर सर व शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी यांनी खेळाडू विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील विभागस्तरीय कबड्डीस्पर्धेत यश मिळविण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### बुधवारचे दिव्यांग तपासणी शिबीर रद्द

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्हा रूग्णालयात नियमितपणे बुधवारी दिव्यांग तपासणी शिबीर घेण्यात येते. मात्र बुधवार, दि. २ ऑक्टोंबर २०२४ रोजी महात्मा गांधी जयंती निमित्त सुट्टी असल्यामुळे शिबीर रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी तपासणीसाठी येऊ नये, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. बि.एस. भुसारी यांनी केले आहे.

### जिल्हा परिषदेतील अनुकंपाधारकांची यादी जाहिर; हरकती मागविल्या

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्हा परिषदेंतर्गत सन २०२४ वर्षाची अनुकंपाधारक उमेदवारांची तात्पुरती सुधारीत यादी जाहिर करण्यात आली आहे. या यादीवर आक्षेप असल्यास दि. ७ ऑक्टोंबरपर्यंत सादर करावे लागणार आहे. जिल्हा परिषदेच्या zpbuldana.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अनुकंपाधारकांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर अनुकंपाधारक उमेदवारांची तात्पुरती ज्येष्ठता यादीवर संबंधितांकडून दि. ७ ऑक्टोंबरपर्यंत लेखी आक्षेप मागविण्यात आले आहे. तसेच अनुकंपाधारक उमेदवारांची शैक्षणिक पात्रतेत वाढ झाली असल्यास शैक्षणिक वाढीचे कागदपत्रे दिलेल्या कालावधीत सादर करावे. तसेच सदर तात्पुरत्या यादीवर काही आक्षेप असल्यास विहित मुदतीत लेखी सादर करावे. आक्षेपांच्या पडताळणीनंतर अनुकंपाधारक उमेदवारांची तात्पुरती यादी अंतिम करण्यात येणार आहे. याची अनुकंपाधारक उमेदवारांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी केले आहे.

# खरिप आणि रब्बी हंगामातील पिक विम्याचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात

## केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंढे व पिक विमा कंपनीच्या बैठकीतील निर्णयाची अंमलबजावणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** खरीप आणि रब्बी हंगामातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये पीक विम्याचे पैसे जमा होण्याला सुरुवात झाली आहे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव राज्याची कृषिमंत्री धनंजय मुंढे व पिक विमा कंपनी झालेल्या बैठकीतील निर्णयाची अंमलबजावणी सुरू झाली आहे त्यामुळे जिल्ह्यातील २७८५४७ शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा लाभ होणार आहे.

बुलढाणा जिल्ह्यात २०२२-२३ आणि २०२३-२४ या वर्षी खरीप आणि रब्बी हंगामामध्ये अतिवृष्टी होवून शेतमालाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते या नुकसानीचे पंचनामे झाल्यानंतर प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत पैसे मिळण्याच्या दृष्टिकोनातून गेल्या महिन्यात राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे व जिल्ह्यातील लोकप्रतिनिधीं आणि पिक विमा कंपनीचे प्रतिनिधी यांच्या बैठक झाली होती या बैठकीमध्ये केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव जाधव सहभागी झाले होते शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईचे



प्रकरणे त्वरित निकाली काढून शेतकऱ्यांच्या खात्यात पीक विमा कंपनीचे पैसे जमा करण्यात यावे यासंदर्भात पीक विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांना निर्देशित करण्यात आले होते त्यानुसार बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात या नुकसान भरपाईचे पैसे जमा व्हायला सुरुवात झाली आहे यामध्ये सन २०२३ २४ खरीप हंगामांतर्गत २४३१४६ शेतकऱ्यांना २३३.६५ कोटी रुपये रब्बी हंगामात २५६१ शेतक ऱ्यांना १.६ कोटी रुपये सन २०२३ २४ खरीप हंगामा अंतर्गत २२१५५८ शेतकऱ्यांना १३८.८४ कोटी रुपये आणि रब्बी हंगामांतर्गत ५६९८९शेतकऱ्यांना १२५.२३ कोटी रुपये असे बुलढाणा जिल्ह्यातील २७८५४७ शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये २६४.०७ कोटी जमा होणार आहे शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पैसे जमा होण्याची कारवाई सुरू झाली आहे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पिक विमा मिळून देण्यासाठी महायुतीच्या लोकप्रतिनिधीनी राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या समावेत बैठक घेवून प्रलंबित नुकसान भरपाईचे दावे मंजूर करून घेतले त्यामुळे शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा व्हायला सुरुवात झाली आहे.